# कार्यालय, नागपूर महानगरपालिका,नागपूर

**सामान्य प्रशासन विभाग**

1 ला मजला, छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकिय इमारत
महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर – 440001
दुरध्वनी क्र. – 0712 – 2567032 / 183
email id –gadnmcnagpur@gmail.com


पत्र क्र. :– साप्रवि. /01/ परि — दि. 16 / 04 / 2016

**परिपत्रक**

अति महत्वाचे

प्रति,

सर्व विभाग प्रमुख, सर्व सहा.आयुक्त झोन क्र. 1 ते 10,
महानगरपालिका, नागपूर.

शिक्षण विभाग आवक क्र. 1776/TR दिनांक 16/4/16 महानगरपालिका नागपूर

सर्व मुख्याध्यापक माध्य/प्राथ, सदर परिपत्रकाची काटेकोरपणे अमलबजावणी करावी.

**विषयः– महाराष्ट्र राज्य स्थापनेचा 56 वा वर्धापन दिन समारंभ दि. 1 मे 2016 (रविवार)**

महाराष्ट्र राज्य स्थापनेचा 56 वा वर्धापन दिनानिमीत्त नागपूर महानगरपालिकेच्या केंद्रिय कार्यालयात ध्वजारोहणाचा कार्यक्रम **मा. महापौर** यांचे शुभहस्ते **दि. 1 मे 2016 रोजी सकाळी 7.10 वाजता** केंद्रिय कार्यालयाच्या प्रागंणात तसेच क्षेत्रिय कार्यालयात ध्वजारोहणाचा कार्यक्रम **संबधित झोनचे सभापती** यांचे शुभहस्ते **उपरोक्त वेळी** संपन्न होईल. तरी सर्व अधिकारी व कर्मचा–यांना सूचित करण्यांत येते की, त्यांनी निर्धारित वेळपूर्वी **राष्ट्रीय पोषाखात** वरील कार्यक्रमास उपस्थित रहावे. **(शासन परिपत्रकानुसार सकाळी 7.15 च्या पुर्वी किंवा सकाळी 9.00 च्या नंतर करण्याचे नमूद केले आहे.)**

1) उपरोक्त कार्यक्रमांना अधिकारी व **कर्मचारी यांची उपस्थिती** अनिवार्य आहे. तरी विभाग प्रमुखांनी अधिनस्थ कर्मचा–यांच्या उपस्थिती बाबत पूर्ण दक्षता घेवून त्यांना पूर्व सूचना दयावी. हया दिवशी राष्ट्रध्वज केंद्रिय कार्यालय व महानगरपालिकेची इतर कार्यालये, शाळा, भवन, दवाखाने, वार्ड/क्षेत्रिय कार्यालये तसेच स्थानिक संस्था कर विभाग नाक्यावर उभारण्यात यावा.

2) केंद्रिय कार्यालयातील ध्वजारोहणांची सपूंर्ण जबाबदारी प्रमुख अग्निशमन अधिकारी पार पाडतील

3) केंद्रिय कार्यालयात होणा–या कार्यक्रमाची व्यवस्था उदा. स्टेज, पोडीयम, डायस, खूर्च्या, तसेच कार्यक्रमाला लागणारे आवश्यक साहित्य यांची सपूंर्ण जबाबदारी विकास अभियंता करतील.

4) केंद्रिय कार्यालयाच्या मुख्य इमारतीवर उभारावयाच्या राष्ट्रध्वजाकरीता तसेच पाहुण्यांकरिता पुष्पहाराची व्यवस्था व कार्यालयातील कारंजे सुरू ठेवण्याची व्यवस्था उद्यान अधिक्षक करतील.

5) केंद्रिय कार्यालयाचे प्रांगण तसेच आजुबाजूचा परिसर साफ करवुन घेण्याची व्यवस्था आरोग्याधिकारी (एस) करतील.

6) उपरोक्त कार्यक्रमाचे अंतर्गत ध्वजारोहणाच्या वेळी राष्ट्रगीत (जन–गण–मन) सामुहिक रित्या गातील. व ती जबाबदारी क्रिडा व सास्कृतिक अधिकारी पार पाडतील.

7) ध्वनीक्षेपणाची व्यवस्था तसेच इमारतीवरील रोशनाई कार्यकारी अभियंता (विद्युत) करतील.

8) निमंत्रण पत्रिका छापून विभागाधिकारी यांचेकडे प्रेषित करण्याचे काम प्रसिध्दी सहाय्यक (जनसंपर्क विभाग) यांचेकडे राहील.

1 मे 2016 राष्ट्रिय कार्यक्रम असल्यामूळे यात कोणतीही हयगय होणार नाही. याची सपूंर्ण दक्षता विभाग प्रमूखांनी घ्यावी.

(मा. आयुक्त यांचे दिनांक 16/ 04 / 2016 चे आदेशान्वये.)

शि. अधि. 16/04/16

( नयना गुंडे )
अपर आयुक्त –I
महानगरपालिका, नागपूर

प्रत माहितीस्तव सादर :–

1. मा. महापौर, म.न.पा, नागपूर
2. मा. उप महापौर म.न.पा, नागपूर
3. मा. अध्यक्ष, स्थायी समिती म.न.पा, नागपूर
4. मा. सत्तारूढ पक्षनेता म.न.पा, नागपूर
5. मा. विरोधी पक्षनेता म.न.पा, नागपूर
6. मा. आयुक्त, म.न.पा, नागपूर